# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६१०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६१२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet :http/www.dte.org.in

क्रमांक :२/एनजीसी/२००२/ २६०५
दिनांक : 7 OCT 2002

प्रति,
प्राचार्य,
विद्यालंकार ज्ञानपिठ ट्रस्टचे विद्यालंकार तंत्रनिकेतन,
विद्यालंकार मार्ग,संगम नगर, ॲन्टाप हिल,
ॲन्टाप हिल, वडाळा(पू)
मुंबई-४०००३७.

विषय- शैक्षणिक वर्ष २००२-०३ साठी विना अनुदान तत्वाबर नवीन तंत्रनिकेतन सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत

संदर्भः- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांकः पीटीआय-२०२ के/ (१८२/०२) तांशि-२, दिनांक १५ जुलै २००२

उपरोक्त विषयाचे संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक ४१८/इएक्स/जीईएन/२००२,, दि. ४ जुलै २००२ अन्वये दिलेल्या परवानगीस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००२-२००३ पासुन विना अनुदान तत्वावर नवीन तंत्रनिकेतन खालील पदविका अभ्यासक्रमासह त्यांच्यासमोर दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी | ६० |
| २ | इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन | ६० |
| ३ | कॉम्प्यूटर इंजिनिअरींग | ६० |
| ४ | कॉम्प्यूटर टेक्नॉलॉजी | ६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रु.५०/-च्या स्टॅम्पेपरवरया संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून नवीन तंत्रनिकेतन सन २००२-२००३ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यांत येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टिईएम-३३८२/१११८३६/(११०)/तांशि-१अ, दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणांस बंधनकारक असतील.



To be filed in D.T.E (H.O.) file

I. T.
rd No 1692
9.10.02

३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यांत यावे. शिक्षकवृंद व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादींबाबत तसेच विद्यार्थ्याकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

४. संस्थेने नवीन तंत्रनिकेतन सुरु करण्यासाठी प्रथम वर्षासाठी नियतठेव म्हणून रु. ६.०० लाख दि सांगली बँक लि. दादर शाखा येथे पावती क्रमांक एसबीबी ६५३३१८, दि.३०/७/२००२ अन्वये ५ वर्षासाठी जमा केलेले आहे.तसेच द्वितीय वर्षासाठी रु.५.०० लाख सयुक्त खात्यात भरणे आवश्यक आहे. संस्थेने दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक,दादर शाखा येथे पावती क्र. २२०७२६,दि.१०/८/२००२ अन्वये रु. २५.०० लाख संस्थाचालक व विभागीय कार्यालय,मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केले आहेत.

५ आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई व सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम आरक्षण शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क शासन मंजूरीप्रमाणे आकारण्यात यावे.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके,नियतकालिके इ. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे.तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. या संचालनालयाने किंवा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई किंवा त्यांच्याकडून प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

९. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१०. संस्थेला सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

११. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फि किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१२. शासनाने, या संचालनालयाने, सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.

( प्रा. न. बा. पासलकर )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:
१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
३. सचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
५. कार्यासन क्रमांक ३/१० मुख्य कार्यालय,मुंबई.